SAMPLE CONTENT

# मराठी (HL)

# व्याकरण - भाषाभ्यास व उपयोजित लेखन

पाठ्यपुस्तकावर आधारित



इयत्ता नववी

(मराठी माध्यम)


सावली म्हात्रे
M.A., D.T.Ed.

हितेश कल्याणकर
BMM-Advertising

अमृत पुलेकर
M.A., B.Ed.



Target Publications® Pvt. Ltd.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे - ०४
यांच्याद्वारे नियोजित पाठ्यपुस्तकावर आधारित.

# मराठी (HL)

# व्याकरण-भाषाभ्यास व उपयोजित लेखन

## इयत्ता नववी

### ठळक वैशिष्ट्ये

- पाठ्यपुस्तक व इयत्ता दहावीच्या कृतिपत्रिका आराखड्यावर आधारित
- भाषाभ्यास विभागातील सर्व घटकांच्या संकल्पनांचे सुलभ स्पष्टीकरण
- भाषाभ्यास विभागात अंतर्भूत घटकांचा परिपूर्ण सराव
- उत्तरे लिहिण्याकरता पर्याप्त जागा उपलब्ध
- उत्तरांचा पडताळा घेण्याकरता उत्तरसूची समाविष्ट
- उपयोजित लेखनातील सर्व घटकांच्या संकल्पनांचे सविस्तर स्पष्टीकरण अंतर्भूत
- उपयोजित लेखनातील प्रत्येक घटकावर आधारित सोडवलेल्या भरपूर कृती
- उपयोजित लेखनातील प्रत्येक घटकामध्ये सरावासाठी मुबलक कृती समाविष्ट

Sample Content

Quill-The Padhai App डाउनलोड करण्यासाठी सोबत दिलेला Q. R. Code स्कॅन करा.
Quill App मध्ये PK-IXMMMARGRAM2022 ही Product Key वापरून तुम्ही ह्या पुस्तकाचे e-book ३० दिवसांपर्यंत मोफत वापरू शकता आणि डिजिटल लर्निंगचा अनुभव घेऊ शकता.

Printed at: **Repro India Ltd.,** Mumbai

© *Target Publications Pvt. Ltd.*
*No part of this book may be reproduced or transmitted in any form or by any means, C.D. ROM/Audio Video Cassettes or electronic, mechanical including photocopying; recording or by any information storage and retrieval system without permission in writing from the Publisher.*

Balbharati Registration No.: 2018MH0022

**TEID: 2596**

P.O. No. 4153

# प्रस्तावना

इयत्ता ९ वी चे वर्ष हे इयत्ता दहावीच्या दृष्टीने महत्त्वाचे असते. त्यामुळे, सर्वच विषयांच्या परिपूर्ण अभ्यासासाठी सारेच प्रयत्नशील असतात. भाषेतही उत्तम गुण मिळवण्याचा प्रत्येकाचाच प्रयत्न असतो. इयत्ता नववीचा पाठ्यक्रम हा महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांनी इयत्ता दहावीकरता निर्धारित केलेल्या कृतिपत्रिका आराखड्यावर आधारित आहे. यात मराठी विषयातील तब्बल ४० गुण हे व्याकरण, भाषाभ्यास व उपयोजित लेखनाला देण्यात आले आहेत. या घटकांच्या सखोल अभ्यासाने यशप्राप्तीचा मार्ग सुखकर बनवण्याकरता, विद्यार्थ्यांना भाषेवर प्रभुत्व मिळवून दहावीकरता सज्ज करण्याकरता टार्गेट प्रकाशनाचे **मराठी (HL) व्याकरण-भाषाभ्यास व उपयोजित लेखन इयत्ता नववी** हे पुस्तक मुलांच्या, हाती सोपवताना आम्हांला अतिशय आनंद होत आहे.

व्याकरण हा भाषेचा पाया असतो. हा पाया मजबूत असेल, तर भाषेचा सुंदर डोलारा येथे उभा करता येतो. व्याकरण व अनेकविध भाषिक घटकांनी भाषा घडलेली असते. त्यांचा अभ्यास करून भाषेवर प्रभुत्व मिळवणे अधिक सोपे होते. शिवाय, व्याकरण व भाषाभ्यास यांवर आधारित प्रश्नांमध्ये पैकीच्या पैकी गुण मिळवणे सहज शक्य असते; मात्र त्याकरता गरज असते ती व्याकरणिक व भाषिक घटकांमागील मूळ संकल्पना समजून घेऊन त्या घटकांचा पुरेसा सराव करण्याची. विद्यार्थ्यांची हीच गरज लक्षात घेऊन आम्ही या संकल्पना सहज, सोप्या शब्दांत मांडल्या आहेतच. शिवाय, सरावाकरता भरपूर प्रश्न समाविष्ट करून त्यांची उत्तरे लिहिण्याकरताही पुरेशी जागा दिली आहे. या पुस्तकाच्या अभ्यासातून विद्यार्थ्यांची व्याकरण व भाषाभ्यासावरील पकड मजबूत होईल असा आम्हांला विश्वास आहे.

'उपयोजित लेखन' हा भाषेचा सृजनात्मक आविष्कार आहे. यातील प्रत्येक घटकाला स्वत:ची अशी एक शैली आहे. ही लेखनशैली पुरेशा सरावाने विकसित करता येते. यादृष्टीने या पुस्तकात उपयोजित लेखन विभागातील प्रत्येक घटकावर आधारित विपुल नमुना कृती देण्यात आल्या आहेत. त्यांचा अभ्यास करून विद्यार्थ्यांमध्ये कल्पनाशक्ती, सृजनशीलता, विचार अभिव्यक्ती, अनुरूप भाषेचा वापर करण्याची क्षमता इत्यादी गुण वाढीस लागतील.

व्याकरण भाषाभ्यास व उपयोजित लेखनातील प्रश्न सोडवताना काय काळजी घ्यावी, प्रत्येक घटकासाठी शब्दमर्यादा, पाळायच्या व टाळायच्या सर्व बाबी यात नमूद करण्यात आल्या आहेत.

व्याकरण व भाषाभ्यासावर आधारित भरपूर कृती, १५ पत्रे, २० कथा, १९ जाहिराती, ५ मुलाखती, ५ संवादलेखन, ८ वृत्तांतलेखन, ५० निबंध एवढा विपुल अभ्यास झाल्यानंतर मुलांना ४० गुणांपैकी जास्तीत जास्त गुण मिळवणे शक्य होईल.

सरावानेच सिद्धी प्राप्त होते असे म्हणतात. हा सराव योग्य दिशेने असावा याकरता हे पुस्तक विद्यार्थ्यांना नक्कीच उपयुक्त ठरेल.

**धन्यवाद!**

**ज्ञानार्थींना मन:पूर्वक शुभेच्छा!**

**प्रकाशक**

**आवृत्ती:** प्रथम

हे पुस्तक परिपूर्ण करण्यासाठी आम्ही सर्वतोपरी प्रयत्न केले आहेत, तरी पुस्तक अधिकाधिक उत्कृष्ट व्हावे, यासाठी आपल्या सूचना स्वागतार्ह आहेत. याकरता आपला अभिप्राय mail@targetpublications.org या इ-मेल पत्त्यावर पाठवावा ही नम्र विनंती.

**Disclaimer**

This reference book is transformative work based on 'मराठी कुमारभारती; तिसरे पुनर्मुद्रण: २०२१' published by the Maharashtra State Bureau of Textbook Production and Curriculum Research, Pune. We the publishers are making this reference book which constitutes as fair use of textual contents which are transformed by adding and elaborating, with a view to simplify the same to enable the students to understand, memorize and reproduce the same in examinations.

This work is purely inspired upon the course work as prescribed by the Maharashtra State Bureau of Textbook Production and Curriculum Research, Pune. Every care has been taken in the publication of this reference book by the Authors while creating the contents. The Authors and the Publishers shall not be responsible for any loss or damages caused to any person on account of errors or omissions which might have crept in or disagreement of any third party on the point of view expressed in the reference book.

© reserved with the Publisher for all the contents created by our Authors.

No copyright is claimed in the textual contents which are presented as part of fair dealing with a view to provide best supplementary study material for the benefit of students.

Sample Content

# अनुक्रमणिका


| क्र. | पाठाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| | **भाषाभ्यास** | |
| • | **व्याकरण** | |
| १. | शब्दांच्या जाती | १ |
| २. | शब्दसिद्धी | ६ |
| ३. | अलंकार | ११ |
| ४. | रसविचार | १६ |
| ५. | वृत्तविचार | १९ |
| ६. | वाक्यांचे प्रकार आणि वाक्यरूपांतर | २३ |
| ७. | वाक्प्रचार | २७ |
| • | **भाषिक घटक** | |
| १. | शब्दसंपत्ती | |
| | • समानार्थी शब्द | ४४ |
| | • विरुद्धार्थी शब्द | ४७ |
| | • लिंग | ५१ |
| | • वचन | ५३ |
| | • शब्दसमूहाबद्दल एक शब्द | ५६ |
| | • म्हणी | ५८ |
| २. | लेखननियमांनुसार लेखन | ६३ |
| ३. | विरामचिन्हे | ६८ |
| ४. | पारिभाषिक शब्द | ७१ |
| | व्याकरण व भाषाभ्यास यांवर आधारित कृतिपत्रिका – १ | ७३ |
| | व्याकरण व भाषाभ्यास यांवर आधारित कृतिपत्रिका – २ | ७५ |
| | व्याकरण व भाषाभ्यास यांवर आधारित कृतिपत्रिका – ३ | ७७ |
| | व्याकरण व भाषाभ्यास यांवर आधारित कृतिपत्रिका – ४ | ७९ |
| | उत्तरे | ८१ |
| | **उपयोजित लेखन** | |
| १. | पत्रलेखन | १०१ |
| २. | कथालेखन | ११७ |
| ३. | जाहिरातलेखन | १२७ |
| ४. | मुलाखत | १४१ |
| ५. | संवादलेखन | १४६ |
| ६. | वृत्तांतलेखन | १४९ |
| ७. | लेखनकौशल्य<br>**(प्रसंगलेखन)** | |

| | निबंध | पृष्ठ | | निबंध | पृष्ठ |
|---|---|---|---|---|---|
| १. | अविस्मरणीय गौरवसोहळा | १५६ | ४. | मी पाहिलेला सूर्यास्त | १५७ |
| २. | मी पाहिलेला अपघात | १५६ | ५. | मी पाहिलेली जत्रा | १५८ |
| ३. | शाळेचे स्नेहसंमेलन | १५७ | ६. | आमची जंगलसफारी | १५८ |


Sample Content

| | निबंध | पृष्ठ | | निबंध | पृष्ठ |
|---|---|---|---|---|---|
| ७. | माझा संस्मरणीय वाढदिवस | १५९ | १२. | असा रंगला सामना | १६१ |
| ८. | मी पाहिलेले पुस्तक प्रदर्शन | १५९ | १३. | माझे पहिले भाषण | १६२ |
| ९. | आमची पावसाळी सहल | १६० | १४. | मी पाहिलेली सर्कस | १६३ |
| १०. | मी फुलवलेली बाग | १६० | १५. | मी अनुभवलेली कार्यशाळा | १६३ |
| ११. | शाळेत साजरा झालेला स्वातंत्र्यदिन | १६१ | • | सराव कृती | १६४ |
| | **(आत्मकथन)** | | | | |
| | **निबंध** | **पृष्ठ** | | **निबंध** | **पृष्ठ** |
| १. | बाकाचे आत्मकथन | १६५ | १२. | पक्ष्याचे आत्मवृत्त | १७१ |
| २. | नदीचे आत्मवृत्त | १६५ | १३. | फळ्याचे आत्मवृत्त | १७२ |
| ३. | झाडाचे आत्मकथन | १६६ | १४. | सायकलचे आत्मकथन | १७२ |
| ४. | मी शेतकरी बोलतोय... | १६७ | १५. | पिंजऱ्यातील वाघाचे आत्मवृत्त | १७३ |
| ५. | पुस्तकाचे आत्मकथन | १६७ | १६. | पडक्या किल्ल्याचे आत्मकथन | १७३ |
| ६. | पृथ्वीचे आत्मकथन | १६८ | १७. | जंगलाचे आत्मवृत्त | १७४ |
| ७. | शाळेचे आत्मवृत्त | १६८ | १८. | सैनिकाचे आत्मवृत्त | १७४ |
| ८. | क्रीडांगणाचे आत्मकथन | १६९ | १९. | मराठी भाषेचे आत्मकथन | १७५ |
| ९. | मोबाइलचे आत्मकथन | १७० | २०. | एका मूर्तीचे आत्मकथन | १७६ |
| १०. | मी आरसा बोलतोय... | १७० | • | सराव कृती | १७६ |
| ११. | समाजसेवकाचे आत्मवृत्त | १७१ | | | |
| | **(कल्पनाप्रधान)** | | | | |
| | **निबंध** | **पृष्ठ** | | **निबंध** | **पृष्ठ** |
| १. | मी पक्षी झाले तर... | १७७ | ९. | पुस्तके नसती तर... | १८२ |
| २. | सूर्य उगवलाच नाही तर... | १७८ | १०. | पेट्रोल संपले तर... | १८३ |
| ३. | माणूस अमर झाला तर... | १७९ | ११. | माणसाची स्मृती नाहीशी झाली तर... | १८३ |
| ४. | शाळा बंद झाल्या तर... | १७९ | १२. | वीज नसती तर... | १८४ |
| ५. | प्रसारमाध्यमे बंद झाली तर... | १८० | १३. | यंत्रे संपावर गेली तर... | १८४ |
| ६. | झाडे बोलू लागली तर... | १८० | १४. | पृथ्वी बोलू लागली तर... | १८५ |
| ७. | इंटरनेट बंद झाले तर... | १८१ | १५. | सूर्य मावळला नाही तर... | १८५ |
| ८. | पाऊस पडला नाही तर... | १८२ | • | सराव कृती | १८६ |



**[टीप: पाठाखाली दिलेले व्याकरण, भाषाभ्यास व उपयोजित लेखनावर आधारित प्रश्न * या चिन्हाने दर्शवले आहेत.]**

Sample Content

## व्याकरण

# १ शब्दांच्या जाती

'शब्द' हा वाक्यातील महत्त्वाचा घटक आहे. कोणत्याही अर्थपूर्ण वर्णसमूहाला शब्द असे म्हटले जाते. शब्दांचे वेगवेगळ्या प्रकारे वर्गीकरण केले जाते. शब्दांच्या जाती आठ आहेत. यांपैकी पहिल्या चार जाती सव्यय असून इतर चार अव्यय आहेत. यांनाच अनुक्रमे **विकारी-अविकारी** असे म्हटले जाते.




### सव्यय (विकारी शब्द)

वाक्यात उपयोगात येताना ज्या शब्दांच्या मूळ रूपात बदल होतो, त्या शब्दांना **सव्यय** किंवा **विकारी शब्द** (बदल घडणारे) असे म्हटले जाते.

**उदा.** माणूस – माणसातला, देव – देवाला

नाम, सर्वनाम, विशेषण आणि क्रियापद या सव्यय किंवा विकारी शब्दजाती मानल्या जातात. यातील नाम, सर्वनाम व विशेषणात विभक्ती, लिंग, वचन व पुरुष यांनुसार बदल होतात, तर क्रियापदांमध्ये काळ व अर्थ यांच्या प्रत्ययांनुसार बदल होतात.

**नाम:**

एखाद्या व्यक्तीला, वस्तूला, पदार्थाला, स्थळाला जे विशिष्ट नाव दिलेले असते, त्यांना **नाम** असे म्हणतात. म्हणजेच, प्रत्यक्षात किंवा कल्पनेने जाणलेल्या वस्तूंना किंवा त्यांच्या गुणधर्मांना जी नावे दिली आहेत, त्यांना व्याकरणामध्ये **नाम** असे म्हणतात.

**उदा.** पर्वत, वाघ, अमित, सोलापूर, रायगड, खुर्ची... इत्यादी.

**सर्वनाम:**

नामांचा पुनरुच्चार करणे किंवा त्यांचा पुन्हा पुन्हा वापर करणे टाळण्यासाठी नामांच्या जागी जी सव्यये वापरली जातात, त्यांना **सर्वनाम** असे म्हटले जाते.

**उदा.** मी, ती, तू, हा, ही...इत्यादी.

**विशेषण:**

नामाबद्दल विशेष माहिती सांगून नामाची व्याप्ती मर्यादित करणाऱ्या शब्दाला **विशेषण** असे म्हणतात.

**उदा.** कडू, चांगला, हुशार, सुंदर, मौल्यवान... इत्यादी.

**क्रियापद:**

ज्या विकारी शब्दामुळे वाक्यातील क्रिया दर्शवली जाते व त्या वाक्याचा अर्थ पूर्ण होतो, वाक्यातील अशा क्रियावाचक शब्दाला **क्रियापद** असे म्हणतात.

**उदा.** पिणे, खेळतो, गातो, आहे, बसला... इत्यादी.

### अव्यय (अविकारी शब्द)

वाक्यात उपयोगात येताना ज्या शब्दांच्या मूळ रूपात बदल होत नाही, त्या शब्दांना **अव्यय** किंवा **अविकारी शब्द** (बदल न घडणारे) म्हणतात. यामध्ये क्रियाविशेषण, शब्दयोगी, उभयान्वयी व केवलप्रयोगी या अव्ययांचा समावेश होतो.

**उदा.**

**क्रियाविशेषण अव्यय:** काल, तेथे, फार, भरभर, वेगाने.

**शब्दयोगी अव्यय:** साठी, पासून, समोर, जवळ, कडे.

**उभयान्वयी अव्यय:** आणि, वा, अथवा, म्हणून, की, परंतु, परी.

**केवलप्रयोगी अव्यय:** अबब!, आहाहा!, वाह!, बापरे!, ओहो!.

**क्रियाविशेषण अव्यय:**

क्रियापदाची विशेष माहिती सांगून क्रियापदाची व्याप्ती मर्यादित करणाऱ्या शब्दाला **क्रियाविशेषण अव्यय** असे म्हणतात. क्रियाविशेषण अव्ययांनी क्रियेचे कोणत्याही प्रकारचे वैशिष्ट्य दाखवले जाते. क्रिया कोठे, केव्हा, कशी, किती वेळा किंवा किती प्रमाणात घडली याविषयी माहिती देणाऱ्या शब्दांनाच **क्रियाविशेषण अव्यये** असे म्हणतात.

**उदा.**
i. आगगाडी **वेगाने** धावते.
ii. **भरभर** चालू नकोस.
iii. **काल** घरी पाहुणे आले होते.
iv. देव **सर्वत्र** आहे.
v. **तेथे** माणसे जमली होती.

Sample Content

**शब्दयोगी अव्यय:**

वाक्यामध्ये जे शब्द स्वतंत्रपणे न येता नामासोबत किंवा सर्वनामासोबत जोडून येतात आणि त्या शब्दाचा इतर दुसऱ्या शब्दाशी असलेला संबंध दाखवला जातो, त्या अव्ययांस **शब्दयोगी अव्यय** असे म्हणतात.

**उदा.** i. घरा**जवळ** गाडी थांबली.
ii. आमच्या घरा**समोर** एक फुलबाग आहे.
iii. सायंकाळी पक्षी घरट्या**कडे** परतले.
iv. झाडा**खाली** फुगेवाला उभा होता.
v. सूर्य डोंगरा**मागे** लपला.

**लक्षात ठेवा**

अनेक क्रियाविशेषणे शब्दयोगी अव्यये म्हणून वापरली जातात अशा वेळी ती प्रत्ययांप्रमाणे शब्दांना जोडूनच लिहायची असतात. शब्दयोगी अव्यये व क्रियाविशेषण अव्यये यांतील फरक समजून घेण्यासाठी खालील दोन गटांतील वाक्ये वाचूयात.

| क्र. | गट - १ | गट - २ |
|---|---|---|
| i. | सूर्य डोंगरा**मागे** दडला होता. | **मागे** समारंभ सुरू होता. |
| ii. | राघव रिना**वर** रागावला. | **वर** पतंग हेलकावे खात होता. |

वरील दोन्ही गटांमध्ये 'मागे', 'वर' हे शब्द दिसतात. पहिल्या गटात ते शब्दांना जोडून आले आहेत, म्हणून ती शब्दयोगी अव्यये आहेत, तर दुसऱ्या गटात ते शब्द स्वतंत्रपणे आले आहेत व वाक्यातील क्रियापदांविषयी विशेष माहिती देत आहेत, म्हणून ती क्रियाविशेषण अव्यये आहेत.

दोन किंवा अधिक शब्द अथवा दोन किंवा अधिक वाक्ये यांना जोडणाऱ्या शब्दाला **उभयान्वयी अव्यय** असे म्हणतात.

**उदा.** i. आम्ही स्टेशनवर पोहोचलो; **परंतु** बस उशिरा आली.
ii. ठाणे **व** मुंबई ही महाराष्ट्रातील मोठी शहरे आहेत.
iii. त्याने खूप अभ्यास केला **आणि** परीक्षेत यश मिळवले.
iv. मला बरे वाटत नव्हते; **म्हणून** मी काल आलो नाही.
v. तो मला भेटला नाही; **कारण** मी घरीच थांबलो होतो.

**केवलप्रयोगी अव्यये:**

केवलप्रयोगासाठी वापरल्या जाणाऱ्या अव्ययांना **केवलप्रयोगी अव्यये** असे म्हणतात. ही अव्यये बोलणाऱ्याच्या मनातील हर्ष, शोक, आश्चर्य, तिरस्कार, अनुमोदन इत्यादी भाव किंवा वृत्ती दर्शवतात, त्यांना केवलप्रयोगी अव्यय असे म्हणतात.

**उदा.** i. **अय्या**! तुम्ही इथे कसे?
ii. **आई गं**! खूप लागलंय तुला.
iii. **वा**! किती छान झालंय जेवण!
iv. **अबब**! केवढा मोठा हत्ती!
v. **शाब्बास**! खूप छान काम केलेस तू.

**सराव कृती**

**कृ.१. खालील सर्वनामांपासून वाक्ये तयार करा.**

i. मी ..............................

ii. आम्ही ..............................

iii. आपण ..............................

iv. तू ..............................

v. हा ..............................

vi. मला ..............................

Sample Content

**कृ.२. खालील वाक्यांत कंसातील क्रियापदाचे योग्य ते रूप घालून वाक्ये पुन्हा लिहा.**

i. आबू निघून ------------------ (जाणे)
ii. आईने पुरणपोळी ------------------ (करणे)
iii. रोहन शाळेत पहिला ------------------ (येणे)
iv. मला चित्रे काढायला फार ------------------ (आवडणे)
v. मीनाने जमिनीवर चटई ------------------ (अंथरणे)
vi. थोड्याच वेळात माझे काम ------------------ (संपणे)

**कृ.३. खालील वाक्यांत कंसातील योग्य ती विशेषणे भरा.**

(लुसलुशीत, काळा, उत्तम, नवीन, दांडगा, मनमोकळ्या)

i. ------------------ गवत सशाला आवडते.
ii. सोहमने ------------------ मोबाइल घेतला.
iii. विशालचे पाठांतर ------------------ आहे.
iv. पवनकडे ------------------ कुत्रा आहे.
v. मीनलचा अभ्यास फार ------------------ आहे.
vi. आम्ही सर्वांनी ------------------ गप्पा मारल्या.

**कृ.४. खालील वाक्यांतील नाम, सर्वनाम, विशेषण, क्रियाविशेषण, क्रियापद ओळखून पुढील तक्ता पूर्ण करा.**

i. जोशी, कुलकर्णी, देशपांडे, पाटील या नामावलीत प्रीतम लुथरा हे वेगळे नाव माझ्या चटकन लक्षात आले.
ii. तुझ्या आईवडिलांना मला ताबडतोब भेटायला सांग.
iii. लिली हार्लेची मुद्रा पांढरी पडली होती.
iv. घोडा वेगाने धावतो.
v. तो भरभर चालत होता.

| क्र. | नाम | सर्वनाम | विशेषण | क्रियाविशेषण | क्रियापद |
|---|---|---|---|---|---|
| i. | ------------------ ------------------ | ------------------ ------------------ | ------------------ ------------------ | ------------------ ------------------ | ------------------ ------------------ |
| ii. | ------------------ ------------------ | ------------------ ------------------ | ------------------ ------------------ | ------------------ ------------------ | ------------------ ------------------ |
| iii. | ------------------ ------------------ | ------------------ ------------------ | ------------------ ------------------ | ------------------ ------------------ | ------------------ ------------------ |
| iv. | ------------------ ------------------ | ------------------ ------------------ | ------------------ ------------------ | ------------------ ------------------ | ------------------ ------------------ |
| v. | ------------------ ------------------ | ------------------ ------------------ | ------------------ ------------------ | ------------------ ------------------ | ------------------ ------------------ |

Sample Content

**कृ.५. खालील वाक्यांतील क्रियाविशेषण अव्यये शोधून लिहा.**

i. रमा वेगाने धावत होती. - ----------

ii. त्याने हात पटकन मागे घेतला. - ----------

iii. अक्षय अतिशय सावकाश बोलतो. - ----------

iv. तो गटागटा पाणी प्यायला. - ----------

v. रोहन ताबडतोब इकडे ये. - ----------

**कृ.६. रिकाम्या जागी योग्य शब्दयोगी अव्यय वापरून वाक्य पुन्हा लिहा.**

(मुळे, जवळ, समोर, विरुद्ध, ऐवजी, पासून, पेक्षा, कडे, साठी, सोबत)

i. माझ्या घरा ---------- मोठे अंगण आहे.

ii. तो माझ्या ---------- मोठा आहे.

iii. वृक्षां ---------- आपल्याला प्राणवायू मिळतो.

iv. तो माझ्या ---------- थांबला होता.

v. सिद्धचे घर शाळे ---------- आहे.

**कृ.७. खालील वाक्यांतील उभयान्वयी अव्यये अधोरेखित करा.**

i. चार्ली पुन्हा स्टेजवर आला आणि उरलेलं गाणं म्हणायला लागला.

ii. विजय नेहमी वेळेत घरी येतो; परंतु अचानक पाऊस आल्याने आज थोडा उशीर झाला.

iii. सकाळी लवकर उठल्याने कामे लवकर आटोपतात शिवाय मनही प्रसन्न राहते.

iv. विजा कडकडू लागल्या अन् पाऊस पडायला सुरुवात झाली.

v. चिमणीने घरट्याबाहेर मान काढली व किलबिलाट केला.

**कृ.८. खालील वाक्यांतील अधोरेखित शब्दांची जात ओळखा.**

i. ते पूर्वी शिक्षणक्षेत्रात कार्यरत होते.

**उत्तर:** ----------

ii. दोन वर्षांच्यापूर्वीच मी नोकरी सोडली आणि व्यवसाय सुरू केला.

**उत्तर:** ----------

iii. आमची शाळा नदीजवळ होती.

**उत्तर:** ----------

iv. ते दुकान इथून जवळ आहे.

**उत्तर:** ----------

v. मला जेवणानंतर बाहेर जायचे आहे.

**उत्तर:** ----------

**कृ.९. कंसातील केवलप्रयोगी अव्ययांचा वापर करून वाक्ये पुन्हा लिहा.**

(छे, अबब, अरेरे, बापरे, शी, चूप, शाब्बास, अरे वाह)

i. ---------- फार वाईट झाले.

ii. ---------- केवढा मोठा आवाज!

iii. ---------- यापुढे एक शब्दही बोलू नकोस.

iv. ---------- खूप चांगले काम केलेस.

v. ---------- किती घाण आहे हा रस्ता!

vi. ---------- किती छान!

Sample Content

**कृ.१०.सहसंबंध शोधा.**

i. अथवा : उभयान्वयी अव्यय :: हळूहळू : ------------------------------------

ii. जवळ : शब्दयोगी अव्यय :: अरेरे! : ------------------------------------

iii. तो : सर्वनाम :: कुरूप : ------------------------------------

iv. राजन : नाम :: झाले : ------------------------------------

v. वर : शब्दयोगी अव्यय :: कारण : ------------------------------------

***कृ.११.खाली दिलेल्या कंसातील शब्दांना 'ईव' प्रत्यय जोडून विशेषणे तयार करा व त्यांच्यासाठी समर्पक विशेष्य शोधून लिहा.**
**उदा. आखणे - आखीव - आखीव कागद**

i. रेखणे - ------------------------------------

ii. कोरणे - ------------------------------------

iii. ऐकणे - ------------------------------------

iv. घोटणे - ------------------------------------

v. राखणे - ------------------------------------

**कृ.१२.खालील शब्दांची विशेषणे, विशेष्य शोधा व लिहा.**

*i. ------------------------ – उद्‌गार

*ii. ------------------------ – यंत्र

*iii. हुबेहूब – ------------------------

*iv. परिपूर्ण – ------------------------

v. ------------------------ – स्वप्न

vi. लोखंडी – ------------------------

vii. ------------------------ – आवाज

viii. ------------------------ – मुलगा

Sample Content

# कृतिपत्रिका – १
## व्याकरण व भाषाभ्यास यांवर आधारित

**विभाग ४ – भाषाभ्यास**

**[सत्र - १ (पाठ १ ते १० व स्थूलवाचन १, २ वर आधारित)]**

**एकूण गुण – १६**

**(अ) व्याकरण घटकांवर आधारित कृती.** **[८ गुण]**

**(१) i. खालील ओळींतील अलंकार ओळखा.** **(१ गुण)**

"डोकी अलगद घरे उचलती।
काळोखाच्या उशीवरूनी।।"

**उत्तर:** ------------------------------------------------

**ii. खालील ओळीतील रस ओळखा.** **(१ गुण)**

आटपाट नगरात दुधाचे तळे, तळ्याच्या काठी पेढ्यांचे मळे

**उत्तर:** ------------------------------------------------

**(२) खालील वाक्यातील अधोरेखित शब्दांच्या जाती ओळखा.** **(१ गुण)**

प्रसिद्धी <u>आणि</u> मानसन्मान त्यांच्या<u>पर्यंत</u> चालत आले.

**उत्तर:** ------------------------------------------------

**(३) खालील उपसर्ग लावून प्रत्येकी एक शब्द तयार करा.** **(१ गुण)**

i. अनु - ------------------ ii. प्रति - ------------------

**(४) पुढील वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा. (कोणतेही दोन)** **(४ गुण)**

i. घाम गाळणे ii. कबूल करणे iii. मात करणे

**उत्तर:** i. ------------------------------------------------

**वाक्य:** ------------------------------------------------

ii. ------------------------------------------------

**वाक्य:** ------------------------------------------------

**(आ) भाषिक घटकांवर आधारित कृती.** **[८ गुण]**

**(१) शब्दसंपत्ती**

**i. खालील शब्दांचे समानार्थी शब्द लिहा.** **(१ गुण)**

अ. सम = ------------------ ब. जीव = ------------------

**ii. खालील शब्दांचे विरुद्धार्थी शब्द लिहा.** **(१ गुण)**

अ. कीर्ती × ------------------ ब. कठोर × ------------------

**iii. खालील शब्दांचे वचन बदला.** **(१ गुण)**

अ. नाते – ------------------ ब. मोती – ------------------

Sample Content

# उत्तरे

## व्याकरण

### १. शब्दांच्या जाती

**क्र.१.**

i. **मी** दुसरीच्या वर्गात नेहमीप्रमाणे हजेरी घेत होते.

ii. **आम्ही** कालच गावावरून आलो.

iii. **आपण** दररोज कार्टून्स पाहतो.

iv. **तू** कर्तृत्ववान आहेस.

v. **हा** अभ्यासात फार हुशार आहे.

vi. **मला** त्या पावसाची मोठी मौज वाटे.

**क्र.२.**

i. आबू निघून **गेला.**

ii. आईने पुरणपोळी **केली.**

iii. रोहन शाळेत पहिला **आला.**

iv. मला चित्रे काढायला फार **आवडते.**

v. मीनाने जमिनीवर चटई **अंथरली.**

vi. थोड्याच वेळात माझे काम **संपेल.**

**क्र.३.**

i. **लुसलुशीत** गवत सशाला आवडते.

ii. सोहमने **नवीन** मोबाईल घेतला.

iii. विशालचे पाठांतर **उत्तम** आहे.

iv. पवनकडे **काळा** कुत्रा आहे.

v. मीनलचा अभ्यास फार **दांडगा** आहे.

vi. आम्ही सर्वांनी **मनमोकळ्या** गप्पा मारल्या.

**क्र.४.**

| क्र. | नाम | सर्वनाम | विशेषण | क्रियाविशेषण | क्रियापद |
|---|---|---|---|---|---|
| i. | जोशी, कुलकर्णी, देशपांडे, पाटील, प्रीतम लुथरा, नामावली, नाव | हे, माझ्या | वेगळे | चटकन | लक्षात आले |
| ii. | आईवडील | तुझ्या, मला | - | ताबडतोब | भेटायला सांग |
| iii. | लिली हार्ले, मुद्रा | - | पांढरी | - | पडली होती |
| iv. | घोडा | - | - | वेगाने | धावतो |
| v. | - | तो | - | भरभर | चालत होता |

**क्र.५.**

i. वेगाने ii. पटकन iii. सावकाश iv. गटागटा v. ताबडतोब

**क्र.६.**

i. माझ्या घरा**समोर** मोठे अंगण आहे.

ii. तो माझ्या**पेक्षा** मोठा आहे.

iii. वृक्षां**मुळे** आपल्याला प्राणवायू मिळतो.

iv. तो माझ्या**साठी** थांबला होता.

v. सिद्धचे घर शाळे**जवळ** आहे.

**क्र.७.**

i. चार्ली पुन्हा स्टेजवर आला आणि उरलेलं गाणं म्हणायला लागला.

ii. विजय नेहमी वेळेत घरी येतो; परंतु अचानक पाऊस आल्याने आज थोडा उशीर झाला.

iii. सकाळी लवकर उठल्याने कामे लवकर आटोपतात शिवाय मनही प्रसन्न राहते.

iv. विजा कडकडू लागल्या अन् पाऊस पडायला सुरुवात झाली.

v. चिमणीने घरट्याबाहेर मान काढली व किलबिलाट केला.

Sample Content

# उपयोजित लेखन

# १ पत्रलेखन

आपल्या मनातील विचार किंवा भावना चांगल्या शब्दांत मांडून दुसऱ्यांपर्यंत पोहोचवण्याचे पत्रलेखन हे एक उत्तम लिखित साधन आहे. आजचे युग हे भ्रमणध्वनी, इंटरनेट, संगणक किंवा इ-मेल यांचे युग आहे. त्यामुळे, पत्रलेखनाची गरज फारशी उरली नाही.

पत्रलेखन ही एक कला असून नव्या तंत्रज्ञानाचा वापर करून पत्रलेखन करणे ही काळाची गरज आहे. हे कसब विद्यार्थ्यांनी नव्या युगाच्या नव्या तंत्रानुसार आत्मसात करावे हा या अभ्यासघटकाचा उद्देश आहे. यासाठी इ-मेल पाठवण्याच्या पद्धतीनुसार पत्रलेखनाचे प्रारूप देण्यात आले आहे.

पत्रलेखनाचे दोन प्रमुख प्रकार आहेत. औपचारिक पत्र व अनौपचारिक पत्र.

- **पत्रलेखन**
  - **औपचारिक पत्र**
    - मागणी पत्र
    - विनंती पत्र
    - तक्रार पत्र
    - आभार पत्र
    - निमंत्रण पत्र इत्यादी.
  - **अनौपचारिक पत्र**
    - आई, वडील, भाऊ, बहीण, नातेवाईक, मित्र-मैत्रिणी यांना लिहिलेले पत्र

इयत्ता नववीच्या अभ्यासक्रमात स्वपरिचय, मागणी, तक्रार या औपचारिक पत्रप्रकारांचा अभ्यास आपण करणार आहोत. इयत्ता दहावीच्या तयारीकरता अभिनंदन पत्र या अनौपचारिक पत्राचाही अभ्यास आपण करणार आहोत. स्वपरिचय पत्र हे कृतिपत्रिकेतील लेखन विभागात समाविष्ट नाही; मात्र विद्यार्थ्यांसाठी हा प्रकार उपयुक्त असल्याने, त्याचा अभ्यास करावा. कृतिपत्रिकेत एखादी सूचना, आवाहन, निवेदन, जाहिरात, विषय इत्यादी प्रकारांपैकी एक कृती दिलेली असते. ती कृती, विषय समजून घेऊन विद्यार्थ्यांनी पत्रलेखन करायचे आहे.

## पत्रात समाविष्ट असलेल्या बाबी

| क्र. | औपचारिक पत्र | अनौपचारिक पत्र |
|---|---|---|
| १. | पत्राच्या वरच्या डाव्या कोपऱ्यात दिनांक लिहावा. | पत्राच्या वरच्या डाव्या कोपऱ्यात दिनांक लिहावा. |
| २. | प्रति, लिहून संबंधित व्यक्तीचा समर्पक हुद्दा नमूद करावा.<br>उदाहरणार्थ: मुख्याध्यापक, प्राचार्य, क्रीडाधिकारी, सचिव, अध्यक्ष, व्यवस्थापक, संचालक, कार्यकारी संचालक, मुख्य कार्यकारी अधिकारी, शिक्षणाधिकारी, कार्यकारी अभियंता इत्यादी. | व्यक्तीचा नात्याप्रमाणे व सन्मानपूर्वक योग्य उल्लेख करावा.<br>उदाहरणार्थ:<br>**नाते** — **मायना** — **अभिवादन**<br>आई/ वडील – तीर्थरूप } साष्टांग नमस्कार<br>काका/ काकू इत्यादी – तीर्थस्वरूप } साष्टांग नमस्कार<br>भावंडं – प्रिय — शुभाशीर्वाद |
| ३. | पत्राचा विषय थोडक्यात लिहावा. | अनौपचारिक पत्राचा विषय लिहिण्याची गरज नसते. |
| ४. | पत्राचा आशय मोजक्या व अचूक शब्दांत मांडावा. | व्यक्तीचे कुशल विचारावे, भावना व्यक्त करणाऱ्या, जिव्हाळा दर्शवणाऱ्या भाषेचा वापर करावा. लेखन विस्तृत करावे. |
| ५. | शेवटी डावीकडे आपला विश्वासू, आपला कृपाभिलाषी इत्यादी शब्द लिहून खाली पत्र पाठवणाऱ्याचे नाव, पत्ता व इ-मेल आयडी टाकावा. | पत्राचा समारोप करताना डावीकडे योग्य मायना वापरावा व त्याखाली पत्र पाठवणाऱ्याचे नाव, पत्ता व इ-मेल आयडी टाकावा. |

**[टीप:** पत्राला उत्तर मिळणे आवश्यक असल्याने पत्र पाठवणाऱ्याचा पत्ता लिहावा लागतो. सर्व पत्रांची मांडणी इ-पत्रानुसार डाव्या बाजूस लिहिणे अपेक्षित आहे. पाकीट काढून पत्ता लिहिण्याची आता आवश्यकता भासत नाही. (इ-मेल लिहिताना पाकीट काढण्याची आवश्यकता नसते.)**]**

Sample content

**लक्षात ठेवा**

१. प्रश्न काळजीपूर्वक वाचून विषय समजून घ्या.
२. निवडलेल्या विकल्पानुसार पत्राचे योग्य प्रारूप व भाषा वापरा.
३. कृतिपत्रिकेत पत्र ज्याला पाठवायचे आहे (प्रति) व पत्र पाठवणारा (प्रेषक) यांचे नाव दिलेले असेल, तर तेच नाव पत्रात वापरा. नाव दिलेले नसल्यास अ. ब. क. वगैरे नाव लिहू शकता.
४. कृतिपत्रिकेत दिलेले पत्तेच पत्रलेखनात वापरा. पत्ते दिलेले नसल्यास काल्पनिक पत्ते लिहा.
५. योग्य प्रारूपात पत्र लिहिण्याचा सराव करा.

**पत्राचे प्रारूप**

दिनांक ________
प्रति, ________
माननीय ________
________
विषय: ________
महोदय/महोदया,
________

मुख्य मजकूर

आपला / आपली,
____________
पत्ता (पत्र पाठवणाऱ्याचा पत्ता)
______________
______________
(इ-मेल आयडी)

स्वपरिचय पत्र म्हणजे स्वत:बद्दलची थोडक्यात माहिती असते. ती संक्षिप्त; पण प्रभावी स्वरूपात असल्यास आपल्या निवडीची शक्यता वाढते. स्वपरिचय पत्राची मांडणी अशी करावी.

१. स्वपरिचय पत्र लिहिताना सुरुवातीला आपले पूर्ण नाव, पत्ता, संपर्क क्रमांक, इ-मेल व जन्मतारीख इत्यादी तपशील लिहावेत.
२. त्यानंतर तपशीलवार आपली शैक्षणिक पात्रता लिहावी. तसेच, काही विशेष प्रशिक्षण घेतले असल्यास तेही नमूद करावे.
३. आपले छंदही लिहावेत. यामुळे, व्यक्तिमत्त्व समजण्यास मदत होते.
४. यानंतर आजवर तुम्हांला असलेला प्रशिक्षणाचा, कामाचा अनुभव विस्तृतपणे लिहावा व पारितोषिके प्राप्त असल्यास त्यांचाही आवर्जून उल्लेख करावा.
५. इतर कलांमध्ये प्रावीण्य मिळवलेले असल्यास तेही नमूद करावे.

अशाप्रकारे, वरील मुद्द्यांची व्यवस्थित मांडणी केल्यास स्वपरिचय पत्र प्रभावीपणे लिहिता येऊ शकते.

**[टीप: स्वपरिचयपत्रातील सर्व माहिती विषयानुरूप; परंतु काल्पनिक असावी.]**

Sample Content

## नमुना कृती

*१ **खालील निवेदन वाचा.**
**संबंधित विषयासाठी स्व-परिचय पत्र तयार करा.**

अभिनव विद्यालय, लातूर.
आंतरशालेय क्रीडास्पर्धा
क्रीडास्पर्धेतील कबड्डी संघात प्रवेश मिळण्याबाबत

स्पर्धा
दि. २६, २७,
२८ डिसेंबर

क्रीडा विभाग प्रमुख

स्वपरिचय पत्राचे मुद्दे

| | | | |
|---|---|---|---|
| १) | संपूर्ण नाव | ५) | उंची - वजन - |
| २) | पत्ता | ६) | शैक्षणिक पात्रता |
| ३) | संपर्क क्रमांक | ७) | इतर आवडणारे खेळ |
| ४) | जन्मतारीख | ८) | पूर्वी प्राप्त केलेले यश |

**उत्तर:** दिनांक: २० नोव्हेंबर, २०२१

प्रति,
अ. ब. क.
माननीय क्रीडा विभाग प्रमुख,
अभिनव विद्यालय,
लातूर - xxxxxx

**विषय:** आंतरशालेय क्रीडास्पर्धेत कबड्डी संघात प्रवेश मिळण्याबाबत.

महोदय,

मी कु. रवी म्हात्रे, इयत्ता नववीमध्ये शिकत आहे. आंतरशालेय क्रीडास्पर्धेत कबड्डी संघात प्रवेश मिळावा यासंबंधीचे सूचनाफलकावरील परिपत्रक (निवेदन) मी वाचले. आपल्या शाळेच्या क्रीडास्पर्धेत मी सलग दोन वर्षे कबड्डी खेळत आहे.

दि. २६, २७ आणि २८ डिसेंबर रोजी होणाऱ्या आंतरशालेय क्रीडास्पर्धेत आपल्या विद्यालयाकडून कबड्डी खेळण्याची संधी मिळावी, याकरिता मी हा अर्ज पाठवत आहे.

सोबत स्व-परिचय पत्र व पासपोर्ट आकाराचे दोन फोटो जोडले आहेत.

कळावे,
आपला विश्वासू,
कु. रवी म्हात्रे,
१०२, साईकृपा अपार्टमेंट,
ता. निलंजा,
लातूर - xxxxxx
ravimhatre@gmail.com

Sample Content

## स्वपरिचय पत्र

**वैयक्तिक माहिती:**

**संपूर्ण नाव** : कु. रवी प्रभाकर म्हात्रे
**पत्ता** : १०२, साईकृपा अपार्टमेंट, ता. निलंजा, लातूर - xxxxxx
**संपर्क क्रमांक**: xxxxxxxxxx
**इ-मेल** : ravimhatre@gmail.com
**जन्मतारीख** : १५ ऑगस्ट, २००५
**उंची** : ५ फूट ३ इंच
**वजन** : ६० किग्रॅ

**शैक्षणिक पात्रता:**

१. ८ वी उत्तीर्ण (८३% गुण). इयत्ता नववीमध्ये शिकत आहे.
२. गेली २ वर्षे 'मावळा' क्रीडासंकुलात कबड्डीचे प्रशिक्षण घेत आहे.
३. पुणे क्रीडासंकुलात दोन महिने तज्ज्ञ कबड्डीपटूंच्या विशेष मार्गदर्शन शिबिरात सहभाग.

**इतर आवडणारे खेळ:** खो-खो, मल्लखांब, क्रिकेट.

**पूर्वी प्राप्त केलेले यश:**

१. शालेय कबड्डी स्पर्धांत वैयक्तिक पातळीवरील उत्तम कामगिरीसाठी प्रथम पारितोषिक प्राप्त.
२. गेली दोन वर्षे केलेल्या सातत्यपूर्ण कामगिरीसाठी शालेय कबड्डी संघात संघनायक म्हणून निवड.
३. सलग दोन वर्षे 'उत्कृष्ट खेळाडू' पुरस्कारप्राप्त.

***२ खालील जाहिरात वाचा आणि सूचनेनुसार पत्रलेखन करा.**

**रसिक कला मंडळ**

समर्थनगर, पुणे

**आकाशकंदील आणि पणत्या तयार करण्याची कार्यशाळा**

दि. ४ व ५ नोव्हेंबर सायं. ४ ते ७

**स्थळ** रानडे सभागृह, समर्थनगर, पुणे

प्रवेश नि:शुल्क
प्रथम येणाऱ्यास प्राधान्य
वस्तू खरेदीची सुवर्णसंधी उपलब्ध

**कार्यशाळेत तयार झालेल्या वस्तू खरेदीची मागणी करणारे पत्र संबंधित मंडळाला लिहा.**

**किंवा**

**तुम्ही खरेदी केलेल्या वस्तूंमध्ये काही वस्तू सदोष आढळल्या, याविषयी तक्रार करणारे पत्र संबंधित मंडळाला लिहा.**

Sample Content

उत्तर:

१. **मागणी पत्र (औपचारिक)**

दिनांक: ०४ नोव्हेंबर, २०२१.

प्रति,
माननीय व्यवस्थापक,
रसिक कला मंडळ,
रानडे सभागृह,
समर्थनगर, पुणे - xxxxxx.

**विषय:** कार्यशाळेत तयार झालेल्या वस्तूंची मागणी करण्याबाबत.

महोदय,

मी अ. ब. क. आपल्याच विभागातील रहिवासी असून आपल्या कार्यशाळेविषयीची जाहिरात माझ्या वाचनात आली. रसिक कला मंडळातर्फे दरवर्षी नावीन्यपूर्ण कार्यशाळा, तसेच सांस्कृतिक कार्यक्रम होत असतात. यावर्षीही आपल्या मंडळातर्फे आकाशकंदील आणि पणत्या तयार करण्याची कार्यशाळा घेण्यात आली. या कार्यशाळेत तयार झालेल्या वस्तू अतिशय आकर्षक, सुबक व पर्यावरणसूचक आहेत, असे काही प्रतिसाद कानावर आले. म्हणूनच, या वस्तूंच्या मागणीकरता हे पत्र लिहीत आहे.
सोबत आवश्यक वस्तूंची यादी देत आहे.

| क्र. | वस्तू | नग |
|---|---|---|
| १. | मोठे आकाशकंदील | ०६ |
| २. | सजावटीसाठी लहान आकाशकंदील | २० |

| क्र. | वस्तू | नग |
|---|---|---|
| ३. | लहान पणत्या | ५० |
| ४. | मोठ्या पणत्या | ३० |

कृपया, या वस्तू लवकरात लवकर पाठवाव्यात, सोबत देयकही द्यावे. त्याचप्रमाणे वस्तूंच्या किमतीवर योग्य ती सवलत द्यावी, ही विनंती.

कळावे,

आपला विश्वासू,
अ. ब. क.
१०३, कृष्णा अपार्टमेंट,
समर्थनगर, पुणे - xxxxxx.
abc@gmail.com

**किंवा**

२. **तक्रार पत्र (औपचारिक)**

दिनांक: ०५ नोव्हेंबर, २०२१.

प्रति,
माननीय व्यवस्थापक,
रसिक कला मंडळ,
रानडे सभागृह,
समर्थनगर, पुणे - xxxxxx.

**विषय:** कार्यशाळेतून खरेदी केलेल्या वस्तूंसंबंधी तक्रार करण्याबाबत.

Sample content

महोदय,

मी अ. ब. क. आपल्याच विभागात राहणारा रहिवासी आहे. आपल्या कार्यशाळेतून दि. ०४ नोव्हेंबर रोजी काही वस्तू मागवल्या होत्या. या वस्तूंमधील काही वस्तू सदोष असल्यामुळे हे पत्र लिहीत आहे.

मागवलेल्या वस्तूंमधील दोन आकाशकंदिलांचे कागद काही ठिकाणी फाटले आहेत; तसेच या आकाशकंदिलांच्या काड्या काही ठिकाणी मोडलेल्या आहेत. मोठ्या पणत्यांपैकी ०६ पणत्या फुटलेल्या आढळल्या आहेत. यामुळे, या सदोष वस्तू मी परत पाठवत आहेत.

या वस्तूंच्या बदल्यात उत्तम दर्जाच्या वस्तू आपण खालील पत्त्यावर लवकरात लवकर पाठवाल अशी आशा बाळगतो.

कळावे,

आपला विश्वासू,
अ. ब. क.
१०३, कृष्णा अपार्टमेंट,
समर्थनगर, पुणे - xxxxxx.
abc@gmail.com

**३ पुढील निवेदन वाचा व त्याखालील कृती सोडवा.**

**कचरापेट्यांची दुर्दशा!**

१७ डिसेंबर (ठाणे) -

ठाणे शहराच्या शिवाईनगर परिसरातील रहिवासी कचऱ्याच्या समस्येला सामोरे जात आहेत. कचरापेट्यांच्या दुर्दशेमुळे रहिवासी त्रस्त झाले आहेत. कचऱ्याच्या दुर्गंधीमुळे नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे. तसेच, गेल्या काही दिवसांत परिसरातील लहान मुलांमध्ये ताप, पोटदुखी, सर्दी इत्यादी साथीच्या आजारांच्या प्रमाणात वाढ झाली असल्याचे निरीक्षणास आले आहे. कचऱ्याचे प्रमाण लक्षात घेता अधिक कचरापेट्या उपलब्ध करून द्याव्यात, तसेच परिसरातील कचरा साफ करावा अशी मागणी परिसरातील रहिवाशांनी ठाणे शहराच्या आरोग्याधिकाऱ्यांकडे केली आहे.

**रहिवाशी या नात्याने नवीन कचरापेट्यांची मागणी करणारे पत्र लिहा.**

**किंवा**

**कचरापेटीच्या दुर्दशेबाबत तक्रार करणारे पत्र लिहा.**

**उत्तर:**

**१. मागणी पत्र (औपचारिक)**

दिनांक: १८ डिसेंबर, २०२१

प्रति,
माननीय आरोग्याधिकारी,
ठाणे महानगरपालिका,
ठाणे (प.) - xxxxxx

**विषय:** नवीन कचरापेट्यांची मागणी करणारे पत्र.



Sample Content

महोदय,

मी अ. ब. क. शिवाईनगर परिसरातील रहिवाशी या नात्याने आपणांस हे पत्र लिहीत आहे. शिवाईनगर बस स्थानकाजवळील कचरापेटीच्या दुर्दशेबाबत आपणांस हे पत्र लिहीत आहे. एकंदरीत या विभागातील नागरिकांच्या संख्येचा विचार करता त्या तुलनेत कचरापेट्यांची उपलब्धता अपुरी पडत आहे. यामुळे, अनेकदा कचरापेटी पूर्णपणे भरून कचरापेटीच्या बाहेरही कचरा साठतो.

या समस्येवर उपाय म्हणून या विभागात सुका कचरा व ओला कचऱ्यासाठी प्रत्येकी एक-एक अशाप्रकारे नवीन कचरापेट्यांची व्यवस्था करण्यात यावी, ही विनंती. आपण लवकरांत लवकर या समस्येकडे लक्ष द्याल, अशी आशा बाळगतो.

कळावे,

आपला विश्वासू,
अ. ब. क.
५०२, रामकृपा अपार्टमेंट,
म्हाडा वसाहतीजवळ, शिवाईनगर,
ठाणे (प.) - xxxxxx
abc@gmail.com

**किंवा**

२. **तक्रार पत्र (औपचारिक)**

दिनांक: १८ डिसेंबर, २०२१

प्रति,
माननीय आरोग्याधिकारी,
ठाणे महानगरपालिका,
ठाणे (प.) - xxxxxx.

**विषय:** कचरापेटीच्या दुर्दशेबद्दल तक्रार करण्याबाबत.

महोदय,

मी अ. ब. क. शिवाईनगर परिसरातील रहिवाशी या नात्याने आपणांस हे पत्र लिहीत आहे. म्हाडा वसाहतीजवळील आम्ही सारेच रहिवाशी कचऱ्याच्या समस्येला तोंड देत आहोत. या कचरापेटीच्या इतरत्र कचऱ्याचा ढीग पडलेला आहे. दोन आठवड्यांहून अधिक दिवस लोटले तरी महानगरपालिकेची 'कचरा गाडी' इथे फिरकली नाही.

या कचऱ्याच्या ढीगामुळे गेल्या काही दिवसांपासून परिसरातील लहान मुलांमध्ये साथीच्या आजारांचेही प्रमाण वाढले आहे. वारंवार तक्रार करूनही अजूनपर्यंत कोणतीही कार्यवाही झालेली नाही. आपण या समस्येकडे लक्ष पुरवाल आणि आम्हांला या समस्येतून मुक्त कराल, अशी आशा बाळगतो.

कळावे,

आपला विश्वासू,
अ. ब. क.
५०२, रामकृपा अपार्टमेंट,
म्हाडा वसाहतीजवळ, शिवाईनगर,
ठाणे (प.) - xxxxxx.
abc@gmail.com

Sample Content

४

**निसर्गाचा सहवास**
**शांती उद्यान**
शाहूवाडी, कोल्हापूर (प.)

औषधी रोपांवर २०% सवलत

विविध फुलझाडे, फळझाडांचे विक्रेते

**आपल्यासाठी काही रोपांची मागणी करणारे पत्र लिहा.**

**किंवा**

**काही रोपे मिळाली नाहीत म्हणून तक्रार करणारे पत्र लिहा.**

**पुढील निवेदन वाचा आणि त्याखालील कृती सोडवा.**

**उत्तर:**

१. **मागणी पत्र (औपचारिक)**

दिनांक: १२ डिसेंबर, २०२१

प्रति,
माननीय संचालक,
शांती उद्यान,
शाहूवाडी,
कोल्हापूर (प.) - xxxxxx

**विषय:** रोपांची मागणी करण्याबाबत.

महोदय,

मी अ. ब. क. आपल्या शांती उद्यानाची जाहिरात वर्तमानपत्रात वाचली. या जाहिरातीमध्ये आपल्या उद्यानातून विविध फुलझाडांची तसेच फळझाडांची विक्री होत असल्याचे समजले. औषधी रोपांवर २०% सवलत आपण देत आहात असेही वाचनात आले. मला माझ्या घरासमोरील बागेसाठी काही फुलझाडे, तसेच औषधी रोपे मागवायची आहेत. त्यांची यादी पुढीलप्रमाणे:

| क्र. | वनस्पतीचे नाव | रोपांची संख्या |
|---|---|---|
| १. | गुलाब | ०२ |
| २. | तुळस | ०१ |
| ३. | कोरफड | ०२ |

| क्र. | वनस्पतीचे नाव | रोपांची संख्या |
|---|---|---|
| ४. | लिली | ०३ |
| ५. | कडुनिंब | ०१ |

ही रोपे लवकरात लवकर खालील पत्त्यावर पाठवावीत ही नम्र विनंती. या रोपांसोबत सवलतीच्या दराने होणाऱ्या रकमेचे देयकही पाठवावे.

कळावे,

आपला विश्वासू,
अ. ब. क.
१२, श्रीनिवास,
शाहूवाडी, कोल्हापूर (प.) - xxxxxx
abc@gmail.com

Sample Content

किंवा

२. **तक्रार पत्र (औपचारिक)**

दिनांक: १२ डिसेंबर, २०२१

प्रति,
माननीय संचालक,
शांती उद्यान,
शाहूवाडी,
कोल्हापूर (प.) - xxxxxx

**विषय:** काही रोपे मिळाली नसल्या कारणाने तक्रार पत्र.

महोदय,

मी अ. ब. क. शांती नगर उद्यानाची जाहिरात वाचून मी आपल्याकडे काही फुलझाडे, तसेच औषधी वनस्पतींची मागणी केली होती; परंतु यातील काही रोपांची संख्या कमी असल्याचे आढळले. या कारणास्तव हे पत्र लिहीत आहे.

मी आपल्याकडे दोन गुलाबाची, तसेच तीन लिलीची रोपे मागवली होती; परंतु गुलाब, लिलीची प्रत्येकी एक-एक रोपे मिळाली आहेत.

तरीही आपण उर्वरित रोपे आपण लवकरात लवकर पाठवाल, अशी आशा बाळगतो.

कळावे,

आपला विश्वासू,
अ. ब. क.
१२, श्रीनिवास,
शाहूवाडी, कोल्हापूर (प.) - xxxxxx
abc@gmail.com

Sample Content

५ **पुढील निवेदन वाचा आणि त्याखालील कृती सोडवा.**

**।। ग्रंथ हेच गुरु।।**
सरस्वती पुस्तकालय
लोकमान्यनगर, ठाणे (प.)

नवीन वर्षानिमित्त पुस्तक खरेदीवर १५% सवलत
सवलत दिनांक - १५ डिसेंबर ते १५ जानेवारी
।। सुवर्णसंधीचा लाभ घ्या।।
- व्यवस्थापक

**संपर्क** - saraswatipustakalay@gmail.com

**वाचक या नात्याने पुस्तकांची मागणी करणारे पत्र लिहा.**

**किंवा**

**वाचक या नात्याने काही पुस्तके सदोष असल्याकारणाने तक्रार करणारे पत्र लिहा.**

उत्तर:

१. **मागणी पत्र (औपचारिक)**

दिनांक: २१ डिसेंबर, २०२१.

प्रति,
माननीय व्यवस्थापक,
सरस्वती पुस्तकालय,
लोकमान्यनगर,
ठाणे, (प.) - xxxxxx

**विषय:** पुस्तकांची मागणी करण्याबाबत.

महोदय,

मी अ. ब. क. वाचक या नात्याने आपणांस हे पत्र लिहीत आहे. आपण सवलतीच्या दरात पुस्तकविक्री करणार असल्याची जाहिरात मी वर्तमानपत्रातून वाचली. मला काही पुस्तकांची मागणी करावयाची होती.
त्यांची यादी मी खाली देत आहे.

| क्र. | पुस्तकाचे नाव | लेखकाचे नाव | नग |
|---|---|---|---|
| १. | माझी जन्मठेप | स्वातंत्र्यवीर सावरकर | ०४ |
| २. | मृत्युंजय | शिवाजी सावंत | ०३ |
| ३. | व्यक्ती आणि वल्ली | पु. ल. देशपांडे | ०२ |

| क्र. | पुस्तकाचे नाव | लेखकाचे नाव | नग |
|---|---|---|---|
| ४. | मी अत्रे बोलतोय | आचार्य अत्रे | ०१ |
| ५. | बोक्या सातबंडे | दिलीप प्रभावळकर | ०२ |

ही पुस्तके खाली दिलेल्या पत्त्यावर लवकरात लवकर पाठवावीत, ही विनंती. सोबत देयकही पाठवावे. आपण या पुस्तकावर योग्य ती सवलत द्याल अशी आशा बाळगतो.

कळावे,

आपला विश्वासू,
अ. ब. क.
१०२, राधाकृष्ण निवास,
राम मारुती रोड,
ठाणे (प.) - xxxxxx
abc@gmail.com

**किंवा**

२. **तक्रार पत्र (औपचारिक)**

दिनांक: २८ डिसेंबर, २०२१.

प्रति,
माननीय व्यवस्थापक,
सरस्वती पुस्तकालय,
लोकमान्यनगर,
ठाणे (प.) - xxxxxx

**विषय:** सदोष पुस्तकांबद्दल तक्रार करणारे पत्र.

Sample Content

महोदय,

मी अ. ब. क., वर्तमानपत्रातील आपली जाहिरात वाचून सरस्वती पुस्तकालयातून काही पुस्तकांची मागणी केली होती; परंतु त्यांपैकी काही पुस्तकांच्याच प्रती वापरण्यायोग्य नाहीत. 'माझी जन्मठेप' या पुस्तकाच्या ०४ प्रती मी मागवल्या होत्या; परंतु यातील दोन प्रती निकृष्ट दर्जाच्या आहेत. तसेच 'मृत्युंजय' या पुस्तकाच्या ०३ प्रती मागवल्या होत्या, यातील ०१ प्रत निकृष्ट दर्जाची आहे.

या पुस्तकांची पाने फाटली आहेत, काहींची पाने गहाळ आहेत, तर दोन पुस्तकांचे बायंडिंगही निघालेले आहे. ही पुस्तके मला भेट द्यायची असल्याकारणाने मी या सदोष प्रती आपल्याकडे पाठवत आहे. या सदोष प्रतींच्या बदल्यात आपण याच पुस्तकांच्या योग्य प्रती खाली दिलेल्या पत्त्यावर लवकरात लवकर पाठवाव्यात, ही विनंती. पाठवण्यापूर्वी या प्रती तपासून पाठवाल, अशी आशा बाळगतो.

कळावे,

आपला विश्वासू,
अ. ब. क.
१०२, राधाकृष्ण निवास,
मारुती रोड, ठाणे (प.) - xxxxxx
abc@gmail.com

**६ पुढील निवेदन वाचा आणि त्याखालील कृती सोडवा.**

**मयूर स्पोर्टस्**
**विश्वास कॉलनी, सोलापूर**

सर्व शाळा – महाविद्यालयांसाठी १५% सवलतीच्या दरात
खेळाचे साहित्य उपलब्ध

दुकानाची वेळ: स. ९:३० ते रा. ८:३०
बुधवार बंद
mayursports@gmail.com

- व्यवस्थापक

प्रथमेश/पुनम पांचाळ विद्यार्थी प्रतिनिधी
शाहू महाराज विद्यालय, सोलापूर या नात्याने

**शाळेसाठी क्रीडासाहित्याची मागणी करणारे पत्र लिहा.**

**किंवा**

**मागावलेले क्रीडासाहित्य निकृष्ट दर्जाचे असल्याकारणाने तक्रार करणारे पत्र लिहा.**

**उत्तर:**

**१. मागणी पत्र (औपचारिक)**

दिनांक: २२ डिसेंबर, २०२१.

प्रति,
माननीय व्यवस्थापक,
मयूर स्पोर्टस्,
विश्वास कॉलनी,
सोलापूर - xxxxxx

**विषय:** शाळेसाठी क्रीडासाहित्याची मागणी करणारे पत्र.

Sample Content

महोदय,

मी प्रथमेश पांचाळ, शाहू महाराज विद्यालय, सोलापूर या विद्यालयातील विद्यार्थी प्रतिनिधी या नात्याने आपणांस हे पत्र लिहीत आहे. आमच्या शाळेसाठी काही क्रीडासाहित्याची आवश्यकता आहे. या आवश्यक क्रीडा साहित्याची यादी मी सोबत जोडत आहे.

| क्र. | क्रीडासाहित्य | नग |
|---|---|---|
| १. | फुटबॉल | ०५ |
| २. | क्रिकेट बॅट | ०४ |
| ३. | क्रिकेट बॉल | १० |

| क्र. | क्रीडासाहित्य | नग |
|---|---|---|
| ४. | बास्केट बॉल | ०५ |
| ५. | बॅटमिंटन रॅकेट | ०४ |

वरील क्रीडासाहित्य दिलेल्या पत्त्यावर लवकरात लवकर पाठवावे, ही विनंती. सोबत देयकही पाठवावे. सवलतीप्रमाणे आपण या वस्तू द्याल, अशी आशा बाळगतो.

आपला विश्वासू,
प्रथमेश पांचाळ,
विद्यार्थी - प्रतिनिधी,
शाहू महाराज विद्यालय,
सोलापूर (प.) - xxxxxx
prathameshpanchal@gmail.com

**किंवा**

**२. तक्रार पत्र (औपचारिक)**

दिनांक: २४ डिसेंबर, २०२१.

प्रति,
माननीय व्यवस्थापक,
मयूर स्पोर्टस्,
विश्वास कॉलनी,
सोलापूर - xxxxxx

**विषय:** मागावलेले क्रीडासाहित्य निकृष्ट दर्जाचे असल्याकारणाने तक्रार करणारे पत्र.

माननीय महोदय,

मी प्रथमेश पांचाळ, शाहू महाराज विद्यालय, सोलापूर या विद्यालयातील विद्यार्थी प्रतिनिधी या नात्याने आपणांस हे पत्र लिहीत आहे. 'मयूर स्पोर्टस्' कडून आमच्या शाळेसाठी काही क्रीडासाहित्याची मागणी करण्यात आली होती; परंतु यातील काही क्रीडासाहित्य निकृष्ट दर्जाचे आढळले आहे.

मागावलेल्या ४ क्रिकेट बॅटपैकी एका बॅटचा दांडा तुटला असल्याचे आढळून आले; त्याचप्रमाणे बॅटमिंटन रॅकेटमधीलही काही रॅकेटस् तुटली आहेत. हे निकृष्ट दर्जाचे क्रीडासाहित्य आम्ही आपल्याकडे पाठवत आहोत.

या निकृष्ट दर्जाच्या क्रीडासाहित्याबदल्यात योग्य माल शाळेच्या पत्त्यावर लवकरात लवकर पाठवावा, ही विनंती! पाठवण्यापूर्वी आपण हे क्रीडासाहित्य तपासून पाठवाल, अशी आशा बाळगतो.

कळावे,

आपला विश्वासू,
प्रथमेश पांचाळ,
विद्यार्थी - प्रतिनिधी,
सोलापूर (प.) - xxxxxx
शाहू महाराज विद्यालय,
prathameshpanchal@gmail.com

**७ पुढील निवेदन वाचा आणि त्याखालील कृती सोडवा.**

**'वाचाल तर वाचाल'**

**युवा मासिक**

युवांसाठी प्रसिद्ध मासिक

अंकासाठी विद्यार्थ्यांकडून स्वलिखित लेख, कविता, कथा,ललित साहित्य मागवण्यात येत आहे.

**संपर्क:** युवा मासिक कार्यालय, प्रभुआळी, पेण, रायगड

**'युवा मासिक' या दिवाळी अंकात तुमच्या चुलत भावाची कविता प्रकाशित झाल्याबद्दल त्याचे अभिनंदन करणारे पत्र लिहा.**

**किंवा**

**वाचक या नात्याने 'युवा मासिक' या दिवाळी अंकाची मागणी करणारे पत्र लिहा.**

**उत्तर:**

**१. अभिनंदन पत्र (अनौपचारिक)**

दिनांक: ९ नोव्हेंबर, २०२१.

प्रिय अमित,
अनेक शुभाशीर्वाद.

काल युवा मासिकाचा दिवाळी अंक विकत घेतला. या अंकात तुझी कविता छापून आल्याचे काकांकडून समजले. तुझे कवी म्हणून नाव आलेले पाहून मला प्रचंड आनंद झाला. मासिकात पहिल्यांदाच तुझी कविता छापून आल्याबद्दल तुझे मनापासून अभिनंदन.

कविता अप्रतिम लिहिली आहेस. किती अचूक शब्दांत तू तुझ्या भावना व्यक्त केल्या आहेस! अपयशाने खचून न जाता त्याच्याशी सामना करून एखाद्या वीराप्रमाणे यश संपादन करावे या आशयाची ही कविता अचूकपणे मांडलेली आहेस. नैराश्याला झटकून पुन्हा उभे राहायला हवे असा संदेश या कवितेत सांगितला आहेस. कवितेची उपजतच गोडी असल्याने प्रगल्भ लिखाण तुझ्या कवितेत दिसून येते.

शब्दसामर्थ्य वाढवण्यासाठी अवांतर वाचन फार मोलाचे काम करते. खूप सारी पुस्तके वाचत जा. कवी म्हणून तुला प्रसिद्धी मिळावी आणि तुझ्या कवितांचे पुस्तक लवकर प्रकाशित व्हावे, हीच सदिच्छा. पुन्हा एकदा तुझे मनपूर्वक अभिनंदन. काकाकाकींना साष्टांग नमस्कार.

तुझा दादा,
अ. ब. क.
रामविलास अपार्टमेंट,
हनुमान नगर,
ठाणे, (पू.) - xxxxxx
abc@xyz.com

**किंवा**

**२. मागणी पत्र (औपचारिक)**

दिनांक: ९ नोव्हेंबर, २०२१.

प्रति,
माननीय संपादक,
युवा मासिक,
प्रभुआळी, पेण,
रायगड - xxxxxx

Sample Content

**विषय:** युवा मासिक दिवाळी अंकाची मागणी करण्याबाबत.

महोदय,

मी आपल्या युवा मासिकाचा नियमित वाचक आहे. मी नेहमीच युवा मासिकाचे दिवाळी अंक विकत घेतो. यावर्षी कोरोनाच्या प्रादुर्भावामुळे आजूबाजूच्या अनेक दुकानांत दिवाळी अंकाच्या प्रती उपलब्ध नाहीत. तुमचा दिवाळी अंक वाचण्यास मी फार उत्सुक आहे.

आपण माझ्या पत्त्यावर दिवाळी अंक पाठवून देण्याची व्यवस्था करावी ही नम्र विनंती. दिवाळी अंक आणि पोस्ट फी यांची रक्कम मी ऑनलाईन भरण्यास तयार आहे.

कळावे,

आपला विश्वासू,
अ. ब. क.
१०३/अ, भारतमाता सोसायटी,
विद्याशंकर नगर,
नवी मुंबई - xxxxxx
abc@xyz.com

**८** **पुढील निवेदन वाचा आणि त्याखालील कृती सोडवा.**

**नाट्यप्रेमी संस्था आयोजित,**

**असेही पाहावे जगून**

दिनांक - २६ जानेवारी, २०२२
वेळ - स. १०:०० ते १२:००
स्थळ - कालिदास नाट्यमंदिर, मुलुंड (प.)

**ऑनलाईन तिकीट विक्री सुरू**

**तिकिटे न मिळाल्याबद्दल तक्रार करणारे पत्र लिहा.** ← **किंवा** → **नाटकात प्रमुख भूमिकेत असलेल्या मित्राला अभिनंदन करणारे पत्र लिहा.**

**उत्तर:**

१. **तक्रार पत्र (औपचारिक)**

दिनांक: २४ जानेवारी, २०२२.

प्रति,
माननीय व्यवस्थापक,
कालिदास नाट्यमंदिर,
मुलुंड (प.) - xxxxxx

**विषय:** तिकिटे न मिळाल्याबद्दल तक्रार करणारे पत्र.

माननीय महोदय,

मी अ. ब. क., आपल्या नाट्यगृहात २६ जानेवारीच्या दिवशी 'असेही पाहावे जगून' हे नाटक दाखवण्यात येणार आहे. या नाटकाच्या प्रयोगाची पाच तिकिटे मी दोन आठवड्यांपूर्वीच ऑनलाईन बुक केली होती; परंतु अद्यापही ती तिकिटे मला मिळालेली नाहीत.

नाटकाचा प्रयोग दोन दिवसांवर आला आहे. आपण लवकरात लवकर तिकिटे उपलब्ध करून द्यावीत ही विनंती.

कळावे,

Sample Content

आपला विश्वासू,
अ. ब. क.,
५०३, साई अपार्टमेंट,
किसननगर,
ठाणे (प.) - xxxxxx
abc@xyz.com

**किंवा**

**२. अभिनंदन पत्र (अनौपचारिक)**

दिनांक: २७ जानेवारी, २०२२.

प्रिय सिद्‌धेश,

सर्वप्रथम तुझे मनापासून अभिनंदन. कालच 'असेही पाहावे जगून' या नाटकाचा प्रयोग पाहिला. तुला मुख्य भूमिकेत पाहून मला खूप आनंद झाला. तू तुझी भूमिका उत्तम निभावलीस. अगदी लहानपणापासून तुला मी विविध नाटकांत काम करताना पाहतोय. तुझ्या अभिनयाचा मी नेहमीच चाहता आहे.

तुझी अभिनयशैली, संवादफेक आणि आवाजाच्या चढ-उताराची कला यांमुळे संपूर्ण नाटकाला रंगत आली. तुझ्या या यशाबद्दल तुझे मनापासून अभिनंदन. उत्तरोत्तर तुला असेच यश मिळो आणि एक अभिनेता म्हणून तुला प्रसिद्‌धी मिळो हीच सदिच्छा.

तुझा मित्र,
अ. ब. क.
सागर निवास,
शास्त्री मार्ग,
भांडुप (प.) - xxxxxx
abc@xyz.com

Sample Content

## सराव कृती

**१ पुढील निवेदन वाचा आणि त्याखालील कृती सोडवा.**

**विद्या स्टेशनरी मार्ट**
२०% पर्यंतची सवलत
शालेय विद्यार्थ्यांकरता सर्व प्रकारचे स्टेशनरी सामान मिळेल.
नौपाडा, स्टेशन रोड, ठाणे (प.)

विद्यार्थी - प्रतिनिधी या नात्याने

**शालेय वापरासाठी स्टेशनरी सामानाची मागणी करणारे पत्र लिहा.** ← **किंवा** → **स्टेशनरी सामान सदोष असल्याकारणाने तक्रार करणारे पत्र लिहा.**

२ पुढील निवेदन वाचा आणि त्याखालील कृती सोडवा.

**ए - प्लस इंटरनेट सेवा**
स्वस्त दरात वेगवान इंटरनेट सेवा

वर्षभराच्या सेवेसाठी १५% सवलत

आजच संपर्क करा
श्री. अमृत म्हात्रे
व्यवस्थापक
aplusinternet@gmail.com

**इंटरनेट सेवेची मागणी करणारे पत्र लिहा.**

← **किंवा** →

**इंटरनेट सेवा वारंवार खंडित होत असल्याची तक्रार करणारे पत्र लिहा.**

३ पुढील निवेदन वाचा आणि त्याखालील कृती सोडवा.

**स्वरसंध्या कलामंदिर आयोजित**
गायन स्पर्धा

दिनांक - ०१ फेब्रुवारी, २०२२
वेळ - सकाळी ९:०० ते दुपार - १२:००
स्थळ - स्वरसंध्या कलामंदिर सभागृह
संपर्क - संचालक, स्वरसंध्या कलामंदिर, नौपाडा, ठाणे

आजच आपल्या नावाची नोंदणी करा.
प्रवेश शुल्क - २५००

**प्रवेश शुल्क भरूनही तुमच्या नावाची नोंदणी झाली नाही, म्हणून तक्रार करणारे पत्र लिहा.**

← **किंवा** →

**तुमच्या मित्राच्या मैत्रिणीचा गायन स्पर्धेत प्रथम क्रमांक आल्याने तिचे अभिनंदन करणारे पत्र लिहा.**

४ पुढील निवेदन वाचा आणि त्याखालील कृती सोडवा.

**महात्मा गांधी जयंतीनिमित्त,**
स्वच्छता सप्ताह

दिनांक - ०२ ऑक्टोबर ते ०८ ऑक्टोबर २०२१
**परिसर स्वच्छता उपक्रम**
आयोजक: ‘स्वच्छता प्रतिष्ठान’, हनुमान व्यायामशाळा, ठाणे.

**स्वच्छता साहित्याची मागणी करणारे पत्र लिहा.**

← **किंवा** →

**स्वच्छता सप्ताहात सहभागी झाल्याबद्दल मित्राचे अभिनंदन करणारे पत्र लिहा.**

Sample Content

# AVAILABLE NOTES FOR STD. IX:

**Eng. Med.**
- English Kumarbharati
- मराठी अक्षरभारती
- हिंदी लोकभारती
- हिंदी लोकवाणी
- आमोद: सम्पूर्ण-संस्कृतम्
- आनन्द: संयुक्त-संस्कृतम्
- History and Political Science
- Geography
- Mathematics (Part - I)
- Mathematics (Part - II)
- Science and Technology

**Mar. Med.**
- My English Coursebook
- मराठी कुमारभारती
- हिंदी लोकभारती
- हिंदी लोकवाणी
- आमोद: सम्पूर्ण-संस्कृतम्
- आनन्द: संयुक्त-संस्कृतम्
- इतिहास व राज्यशास्त्र
- भूगोल
- गणित (भाग - I)
- गणित (भाग - II)
- विज्ञान आणि तंत्रज्ञान

## Additional Titles:

**Grammar & Writing Skills Books (Std. IX & X)**
- Marathi
- Hindi
- English

# AVAILABLE NOTES FOR STD. X:

**Eng. Med.**

PERFECT SERIES
- English Kumarbharati
- मराठी अक्षरभारती
- हिंदी लोकभारती
- हिंदी लोकवाणी
- आमोद: सम्पूर्ण-संस्कृतम्
- आनन्द: संयुक्त-संस्कृतम्
- History and Political Science
- Geography
- Mathematics (Part - I)
- Mathematics (Part - II)
- Science and Technology (Part - 1)
- Science and Technology (Part - 2)

**Eng. Med.**

PRECISE SERIES
- English Kumarbharati
- मराठी अक्षरभारती
- हिंदी लोकभारती
- History, Political Science and Geography
- Science and Technology (Part - 1)
- Science and Technology (Part - 2)

**Mar. Med.**

PRECISE SERIES
- My English Coursebook
- मराठी कुमारभारती
- हिंदी लोकभारती
- हिंदी लोकवाणी
- आमोद: सम्पूर्ण-संस्कृतम्
- आनन्द: संयुक्त-संस्कृतम्
- इतिहास व राज्यशास्त्र
- भूगोल
- गणित (भाग - I)
- गणित (भाग - II)
- विज्ञान आणि तंत्रज्ञान (भाग - १)
- विज्ञान आणि तंत्रज्ञान (भाग - २)

## OUR PRODUCT RANGE

Children Books | School Section | Junior College

Degree College | Entrance Exams | Statponery




Explore our range of **STATIONERY**

**Target Publications® Pvt. Ltd.**

**Address:**
2nd floor, Aroto Industrial Premises CHS,
Above Surya Eye Hospital, 63-A, P. K. Road,
Mulund (W), Mumbai 400 080

**Tel:** 88799 39712 / 13 / 14 / 15
**Website:** www.targetpublications.org
**Email:** mail@targetpublications.org

**Visit Our Website**